महाराष्ट्र शासन

**महसूल व वनविभाग**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, दापोली**

दापोली-हर्णे रोड, पेट्रोल पंपासमोर, दापोली ता. दापोली जि. रत्नागिरी

दुरध्वी व फॅक्स क्रमांक : ०२३५८-२८२०३६, Email : *tah_dapoli@rediffmail.com*

दि. २९/०८/२०१९

**क्रमांक/एलएनए-२/२४X७तक्रार /१९**

**प्रति**

**मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी**
**(नियंत्रण कक्ष)**

**विषय:-** पंचनदी देवस्थान येथील अतिक्रमणे हटविण्याबाबत.

**संदर्भ:-** १. श्री पंढरीनाथ जावळे यांचा २४ X७ तक्रार निवारण प्रणालीवरील अर्ज.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री कालभैरव देवस्थान ट्रस्ट पंचनदी सर्व्हे नं १३९/४ ता. दापोली या जागेत श्री विजय केरू राणे व श्री सुर्याजी भायजी राणे यांनी अनधिकृत बांधकाम केलेले असून ते हटविणेबाबत. २४ X७ तक्रार निवारण प्रणालीवरील तक्रारी अर्ज केलेला आहे. सदर अर्जाबाबत मंडळ अधिकारी बुरोंडी यांनी चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

मौजे पंचनदी ता. दापोली येथील सर्व्हे नं १३९ हि.नं ४ ही जागा शासकीय जागा असून कब्जेदार सदरी देवाची सहाण असा उल्लेख आहे. सदर ठिकाणात देवाची सहाण, नाटयगृह, व श्री सुर्याजी भायजी राणे व श्री विजय केरू राणे यांच्या घरांची अंशतः बांधकामे केलेली आहेत. असे पूर्वीच निदर्शनास आलेने नोटीसा देणेत आल्या होत्या सदर बांधकामापैकी श्री विजय केरू राणे यांच्या घराचा भाग काही प्रमाणात सरकारी जागेत असल्याने यापूर्वीच त्यांना नोटीशीने कळवून बांधकाम काढून टाकणेबाबत कळविणेत आले होते. परंतू त्यांनी सदर नोटीशीविरूध्द मा. दिवाणी न्यायालय रत्नागिरी येथे दावा क्र ५५/११ व ५६/११ अन्वये दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दिनांक १८/६/२०१४ रोजी लागला असून सदर दावा मा. दिवाणी न्यायालयाने फेटाळला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा :
आवक नं. २४५७
दि. 11 SEP 2019
विशेष नोंदवही नं :-
कार्य विवरण नं. :-
प्र. लि. नि.उ. जि. जिल्हाधिकारी

तरी सदयस्थितीत श्री विजय केरू राणे व श्री सुर्याजी भायजी राणे यांना जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० मधील तरतुदीप्रमाणें सदरचे शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे स्वखर्चाने काढून टाकणेबाबत या कार्यालयाकडून नोटीस देण्यात आलेली आहे. तरी अर्जदार यांचा २४ x७ तक्रार निवारण प्रणालीवरील अर्ज निकाली ठेवणेस विनंती आहे.

आपला विश्वासू

(समीर घारे)
तहसिलदार दापोली